# महाराष्ट्र शासन

## इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

## कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दिक्षाभूमी रोड, श्रध्दानंद पेठ, नागपूर - 440 022

दुरध्वनी क्रं. 0712-2959381 CIN: U85300PN2019NPL187405 ई मेल mahajyotingp@gmail.com


जा.क्र. महाज्योती, नागपूर/आस्था/2650/2023-24, दिनांक :-05/12/2023

**-:परिपत्रक:-**

**विषय :- UPSC प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण संस्था निवडीकरीता पुन्हा संधी उपलब्ध करून देणेबाबत.**

महाज्योतीने दि.28/11/2023 रोजी UPSC प्रशिक्षणाचा निकाल जाहीर केलेला आहे. तसेच या प्रशिक्षणाकरीता खालील प्रमाणे तीन संस्था उपलब्ध आहेत. संस्थाना प्रशिक्षण द्यावयाच्या विद्यार्थांची संख्या संस्थेसमोर नमूद केलेली आहे.त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

| अ.क्र | प्रशिक्षण संस्थेचे नाव | ठिकाण | माध्यम | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीराम आय. ए. एस. अकादमी, नवी दिल्ली येथील प्रशिक्षण केंद्र | श्रीराम आय ए एस टॉवर, 10-B, पुसा रोड, बडा बाजार मार्ग, ओल्ड राजेंद्र नगर, निअर कारोल बाग मेट्रो स्टेशन, पिल्लर नं. (112) न्यु दिल्ली - 110060. | इंग्रजी | 1000 |
| 2 | ज्ञानदीप ॲकडमी, पुणे | TCG स्क्वेअर बिल्डींग, अल्का टॉकीज समोर, अल्का टॉकीज चौक, टिळक रोड, सदाशिव पेठ, पुणे - 411030 | मराठी | 375 |
| 3 | युनिक ॲकडमी, पुणे येथील प्रशिक्षण केंद्र | युपीएससी कॅम्पस, अक्षरनंदन शाळे जवळ, J W Marriott हॉटेलच्या मागे, सेनापती बापट रोड, बहिरटवाडी, गोखलेनगर, पुणे - 411016 | मराठी | 375 |
| | | | **एकूण जागा** | 1750 |

या अनुषंगाने विद्यार्थ्यांना संस्था निवडीचा पर्याय उपलब्ध करून देण्यात आला होता. तथापि आता विद्यार्थ्यांच्या अशा तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत की, उमेदवारांनी ज्या प्रशिक्षण संस्थेस प्राध्यान्य दिलेला होता त्या संस्थेकरीता त्यांची निवड झालेली नाही. या अनुषंगाने प्राप्त तक्रारींचा विचार करता विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्था निवडण्याची संधी पुन्हा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात येत आहे.

त्यामुळे महाज्योतीने दि.04/12/2023 रोजीचे परिपत्रक क्र. महाज्योती,नागपूर/आस्था/2631/2023-24 व महाज्योती, नागपूर/आस्था/2636/2023-24 हे रद्द करण्यात येत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सद्यस्थितीत कोणत्याही प्रशिक्षण संस्थेत प्रवेश घेऊ नये.

विद्यार्थ्यांना संस्था निवडीची लिंक www.mahajyoti.org.in या संकेतस्थळावरील नोटीस बोर्डमध्ये दि.05/12/2023 रोजी पासुन दि.08/12/2023 पर्यंत पुन्हा संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांनी सदर लिंक चा वापर करून त्यांना ज्या संस्थेला प्राध्यान्य द्यावयाचे आहे, त्या संस्थेची निवड करावी. दिल्ली येथील प्रशिक्षण इंग्रजी माध्यमातील असल्यामुळे ज्यांना इंग्रजी माध्यामातून प्रशिक्षण नको आहे अशा विद्यार्थ्यांनी दिल्ली येथील संस्थेची निवड करू नये. तसेच पुणे येथील संस्थांमध्ये एकुण 750 जागा मराठी माध्यमाकरीता उपलब्ध आहेत. त्यामुळे मराठी माध्यमातून 750 विद्यार्थ्यांची निवड करण्यात येईल, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

विद्यार्थ्यांना प्राप्त गुण आणि त्यांनी दिलेल्या प्रशिक्षण संस्था निवडीचे प्राधान्यक्रम या बाबी विचारात घेऊन विद्यार्थ्यांना प्रशिक्षण संस्था ठरवून देण्यात येईल व तदनंतर प्रवेश घेण्याबाबतच्या स्वतंत्र सुचना निर्गमित करण्यात येतील.

स्वा
(राजेश खवले)
व्यवस्थापकीय संचालक
महात्मा ज्योतीबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती), महाराष्ट्र राज्य, नागपूर